# <u>प्रेस नोट</u>

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील स्वारगेट पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील ०६ गुन्हेगार इसमांना पुणे शहर व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- २७/०६/२०१९

स्वारगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील इसम नामे (१) प्रणय उर्फ गोटया अनिल गायकवाड.वय-१९ वर्षे रा.पीएमसी कॉलणी नं.९ बि.नं.८,रुम नं.६८,घोरपडी पेठ,पुणे (टोळी प्रमुख (२) सुमित भरत दिघे.वय .१८ वर्षे रा.६९/३, पर्वती दर्शन, पुणे. (टोळी सदस्य) (३) महेश राजेंद्र नवले वय-२१ वर्षे.रा.गोलघर पी-२, स्वप्नपूर्ती अपार्टमेंट, पर्वती, पुणे.(टोळी सदस्य) (४) रमिज नाझीर सैय्यद.वय-२१ वर्षे रा.पीएमसी कॉलणी नं.९,रुम नं.५५, घोरपडी पेठ, पुणे(टोळी संदस्य) (५) विकास दिलीप मांढरे.वय-३० वर्षे रा.१०९/५४ लोहीयानगर,एस.आर.ए.बिल्डींग,पुणे (टोळी सदस्य) (६) अभिजित कांतीलाल पाटोळे.रा.४८६, महात्माफुलेवाडा,गंज पेठ,पुणे (टोळी सदस्य) यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश. ०६/२०१९ दिनांक २७/०६/२०१९ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्र व पुणे जिल्ह्याच्या हंद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसमांविरुध्द ते एकत्रित व वैयक्तिक गुन्हे करत होते. त्यांचे विरुध्द खून करण्याचा प्रयत्न करणे, जखमी करणे, हाताने मारहाण करुन धमकी देणे, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत करणे, सामाईक इरादा, प्रतिबंधक आदेशाचा भंग करणे, गंभीर दुखापत करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे स्वारगेट, खडक, दत्तवाडी पोलीस ठाणे येथे दाखल असून टोळी प्रमुख (१) प्रणय उर्फ गोटया अनिल गायकवाड.वय-१९ वर्षे रा.पीएमसी कॉलणी नं.९,बि.नं.८,रुम नं.६८,घोरपडी पेठ,पुणे (टोळी प्रमुख) व इतर टोळी सदस्य यांची सदर भागात दहशत असल्याने त्यांना **बच्चन सिंह पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर** यांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातून व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.